Purushottam Khaparde Health & Education Society's
Yashoda Girls'
Arts & Commerce College, Nagpur
• Recognized by Government of Maharashtra • Affiliated to RTM Nagpur University, Nagpur
Re-accredited by NAAC 'B++' Grade (Second Cycle March - 2023)
• Tel. : 0712 - 2290368 • Email : ygc.ngp@rediffmail.com
Sneh Nagar, Wardha Road, Nagpur 440015
------------ DEPARTMENT OF PHYSICAL EDUCATION ----------
Dr.Lalita Punnya–9850348812

# NATIONAL SERVICE SCHEME (NSS)

# ANNUAL ACTIVITIES (2024-2025)

| SR. NO. | ACTIVITY | DATE |
|---|---|---|
| 1 | आंतरराष्ट्रीय योग दिन | २१/६/२०२४ |
| 2 | वृक्षारोपण (कॉलेज परिसर व विठ्ठल मंदिर, स्नेह नगर ) | २४/०६/२०२४ |
| 3 | स्वच्छता अभियान | १३/०८/२०२४ |
| 4 | हर घर तिरंगा रॅली | १४/०८/२०२४ |
| 5 | सदभावना दिन | २०/०८/२०२४ |
| 6 | महिला सक्ष्मीकरण | २४/०८/२०२४ |
| 7 | ओझोन डे | १६/०९/२०२४ |
| 8 | राष्ट्रीय सेवा योजना दिन (सायबर क्राईम) | २४/०९/२०२४ |
| 9 | सडक सुरक्षा जागरुकता | २५/०९/२०२४ |
| 10 | स्वच्छता हि सेवा | २७/०९/२०२४ ते ०१/१०/२०२४ |
| 11 | मतदान जनजागृती | २४/१०/२०२४ ते २६/१०/२०२४ |
| 12 | दिवाली विथ माय भारत पोर्टल | २८/१०/२०२४ |
| 13 | संविधान दिन | २६/११/२०२४ |
| 14 | एचआयव्ही एड्स दिन | २/१२/२०२४ |
| 15 | जंतनाशक दिन | ५/१२/२०२४ |
| 16 | आरोग्य तपासणी शिबीर | १५/०१/२०२५ |
| 17 | राष्ट्रीय सेवा योजना शिबीर | १९/०१/२०२५ ते २५/०१/२०२५ |
| 18 | पंचवटी वृद्धाश्रमला भेट | २१/०२/२०२५ |
| 19 | नेत्र दान मार्गदर्शन | २५/०२/२०२५ |
| | | |

| Sr. No. | Date&NameofActivity | Report |
|---|---|---|
| 1 | **Date: Friday , 21/06/2024**<br>**आंतरराष्ट्रीय योग दिन**<br><br> | **आंतरराष्ट्रीय योग दिन -** आंतर राष्ट्रीय योग दिनानिमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात डॉ. महेंद्र कटरे योगतज्ञ यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. योगाचे महत्व सांगून प्रात्यक्षिक करून दाखवले. व सर्वाकडून करवून घेतले.<br>. |
| 2 | **Date: Monday , 24/06/2024**<br>**वृक्षारोपण**<br><br> | **वृक्षारोपण :** महाविद्यालया तर्फे विठ्ठल रुक्मिणी मंदिर स्नेह नगर येथे वृक्षारोपण करून वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना च्या विद्यार्थिनी व शिक्षकांनी अनेक रोपटे मंदिर परिसरात लावली. या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. डॉ. शरद सांबारे सर यांनी पर्यावरण संतुलना कारिता वृक्षारोपण करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. ललिता पुन्नय्या व आभार डॉ. महेन्द्र कटरे यांनी केले. |
| 3 | **Date: Tuesday , 13/08/2024**<br>**स्वच्छता अभियान**<br><br> | **स्वच्छता अभियान-** महाविध्यालायातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मंगळवार दिनांक १३/०८/२०२४ रोजी महाविद्यालयात स्वच्छता अभियान कार्यक्रम राबवण्यात आले. या अंतर्गत विद्यार्थिनी द्वारे महाविद्यालयातील परिसर, आजूबाजूचा परिसर स्वच्छ करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. शरद सांबारे सरांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकारिता सर्व प्राध्यापक व व विद्यार्थिनीचे सहकार्य लाभले. |

| | | |
|---|---|---|
| 4 | **Date: Wednesday, 14 /08/2024**<br>**हर घर तिरंगा रँली**<br><br> | **हर घर तिरंगा रँली -**महाविद्यालयात बुधवार दिनांक १४ /०८/२०२४ रोजी हर घर तिरंगा रँली चे आयोजन करण्यात आले. रँली ची सुरवात महाविद्यालायातून करण्यात आली. संपूर्ण स्नेह नगर परिसरात रँली काढण्यात आले. विद्यार्थी द्वारे देशभक्तीपर स्लोगन, नारे म्हणण्यात आले. प्रतेकानी आपल्या घरी तिरंगा फडकावा असे विद्यार्थिनीनि सर्वाना सांगितले. रँली ची समापन महाविद्यालयात करण्यात आले.कार्यक्रमाचे आयोजनमहाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद सांबारेसरांच्या मार्ग्दर्शनात करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता सर प्राध्यापक व विद्यार्थिनीचे सहकार्य लाभले. |
| 5 | **Date:Tuesday,20/08/2024**<br>**सदभावना दिन**<br><br> | **सदभावना दिन-**महाविद्यालयात मंगळवार दिनांक २०/०८/२०२४ रोजी राजीव गांधी जयंती निमित्य कार्यक्रम घेण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद सांबारे सरांनीविद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. प्राध्यापक राजेश घोगरे यांनी राजीव गांधी यांचे जवान चरित्र सांगितले. सदभावना दिवसाची शपथ घेण्यात आली. या प्रसंगी सर्व प्राध्यापक व विद्यार्थिनी उपस्थित होते. |
| 6 | **Date: Saturday 24/08/2024**<br>**महिला सक्षमीकरण**<br><br> | **महिला सक्षमीकरण** महविद्यालयातवुमेन इमपावार्मेट सेल व राष्ट्रीय सेवा योजना विभागयांच्या संयुक्त विद्यमाने "महिला सक्षमीकरण" या विषयावर कार्यक्रम आयोजीत करण्यात आला.या प्रसंगी डॉ. प्रा. रश्मी नारनवरे यांनी विद्यार्थीनिना मार्गदर्शन केले.त्यांनी महिला सक्षमीकरणयाचा अर्थ,महिला शसश्क्तीकरण चे महत्व,महिला सुरक्षा करिता असलेले वेगवेगळे हेल्प लाईन नंबर तसेच महिला सुरक्षा करिता असलेले अँप याची संपूर्ण माहिती दिली. महिला सक्षमीकरणाच्या माद्यमातून महिलां समाजात समान दर्जा मिळतो.शिक्षण,ज्ञान,नेतृत्व आणि उद्योगाची संधी मिळते.या माद्यमातून महिला समाजात सक्रीय योगदान करू शकतात. असे मत त्यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविध्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद सांबारे यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. विद्यार्थिनीने आपले आचरण चांगले ठेवावे. त्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव असावी.तसेच महिला सुरक्षा हेतू असलेले वेगवेगळे हेल्प लाईन नंबर व अँप आपल्या जवळ ठेवावे.असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे आयोजन व संचालनडॉ.ललिता पुन्नय्या व आभार डॉ. झारिना सलीम यांनी केले.कार्यक्रमात विद्यार्थिनीनि सहभाग घेतला. |

| | | |
|---|---|---|
| 7 | **Date: Tuesday,17/09/2024**<br>**ओझोन डे**<br> | **ओझोन डे -** महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मंगळवार ओझोन दिनानिमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. शरद सांबारे सरांनी "ओझोन डे" केंव्हा व का सुरु करण्यात आले. या विषयावर मार्गदर्शन केले. ओझोन लेअर सुरक्षित ठेवण्याकरिता पर्यावरण संतुलन आवश्यक आहे. पर्यावरण संतुलनाकरिता जास्तीत जास्त वृक्ष लावणे व त्याचे संगोपन करणे गरजेचे आहे. असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच डॉ. ललिता पुन्नय्या यांनी ओझोन डे विषयी आपले विचार व्यक्त केले. विद्यार्थिनीद्वारे स्नेह नगर परिसरात रँली काढण्यात आली. कार्यक्रमात विद्यार्थीनिनि व प्राध्यापकांनी सहभाग घेतला. |
| 8 | **Date: Tuesday,24/09/2024**<br>**राष्ट्रीय सेवा योजना दिन -सायबर क्राईम**<br><br> | **राष्ट्रीय सेवा योजना दिन -सायबर क्राईम -**<br>यशोदा गर्ल्स आट्र्स अँड कॉमर्स कॉलेज स्नेह नगर नागपूर येथे राष्ट्रीय सेवा योजना व महिला सक्षमीकरणविभागांतर्गत"**सायबर क्राईम**" या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या करिता दिपाली मडावी प्रोजेक्ट कोआरडीनेटर, प्रकृती असोसियेशन (NGO), नागपूर,यांना मार्गदर्शना करिता आमंत्रित करण्यात आले.कार्यक्रमाच्या सुरवातीला डॉ. ललिता पुन्नय्या यांनी राष्ट्रीय सेवा योजना दिन विशेष निमित्य राष्ट्रीय सेवा योजनाचे महत्व, सांगितले. दिपाली मडावी यांनी महिलांवर तसेचअल्पवयीन मुलीवर होणारे अत्याचार,प्रेमप्रकरण, सायबर क्राइम, (सोशल मिडिया द्वारा जे गुन्हे होतात)त्यातून महिलांनी आपली सुरक्षा कशी करावी याविषयी साध्या व सोप्या भाषेत विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. शलाका बिनीवाले मँडम यांनी विद्यार्थीनीना सोसल मिडिया, आर्थिक गुन्हे, ओंनलाईन गेम्स द्वारे गुन्हे या विषयावर मार्गदर्शन केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविध्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद सांबारे यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. |
| 9 | **Date: Wednesday, 25 /09/2024**<br>**सडक सुरक्षा जागरुकता**<br><br> | **सडक सुरक्षा जागरुकता-**महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व जन आक्रोश संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विध्यमाने कार्यक्रमाचे आयोजन रोजी करण्यात आले. त्याकरिता जन आक्रोश संस्था, नागपूर चे पदाधिकारी यांना आमंत्रित करण्यात आले. सर्वप्रथम त्यांनी विद्यार्थीनीना विद्यार्थीनीना सडक सुरक्षा व अपघात कसे टाळता येईल याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर स्नेह नगर परिसरात रँली काढण्यात आली. चौकात विद्यार्थीनीना चारहि भागात पाठवले. विभागात प्रतेक गटासोबत महाविद्यालयाचे प्राध्यापक व जन आक्रोश संस्थेतील मार्गदर्शक उभे होते. त्यांच्या हातात वाहतूक नियंत्रणाचे फलक देऊन, छोटे छोटे नियम कसे पाळायला पाहिजे हे सांगून त्यांना वाहतूक नियंत्रण करण्यास सांगितले. |

| | | |
|---|---|---|
| 10 | **Date: Friday, 27/09/2024 to Tuesday 01/10/2024**<br>**स्वच्छता हि सेवा**<br><br><br><br> | **स्वच्छता हि सेवा"-** स्वच्छता हि सेवा" अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन - **स्वच्छता अभियान जनजागृती कर्यक्रम : शुक्रवार दिनांक** २७/०९/२०२४ रोजी महाविद्यालयात स्वच्छता अभियान जनजागृती कर्यक्रम घेण्यात आले. प्रा. पोर्णिमा ठेकेदार मँडम यांनी **स्वच्छतेचे महत्व** या विषयावर मार्गदर्शन केले. ओला कचरा व् सुखा कचरा विलगीकरण कसे करावे हे सांगितले. प्रा. ललिता पुन्नय्या यांनी **स्वच्छता चे** आपल्या शारीरिक व् मानसिक आरोग्यावर कसा परिणाम होतो ते सांगून वैयक्तिक स्वच्छता कशी करावी याची माहिति दिली.. **स्वच्छता अभियान शपथ शुक्रवार दिनांक २७/०९/२०२४**महाविद्यालयात स्वच्छता अभियान जनजागृती कर्यक्रम घेण्यात आले. आम्ही सर्व स्वताची वैयक्तिक स्वच्छता आपले घर, आजूबाजूचा परिसर, महाविद्यालय परिसर नेहमीच स्वच्छ ठेऊ. राष्ट्र सेवा व् देश सेवा करण्यात हातभार लाऊ अशी शपथ घेण्यात आली. **स्वच्छता अभियान : शनिवार दिनांक २८/०९/२०२४ व मंगळवार दिनांक ०१/१०/२०२४** रोजी स्वच्छता अभियान अंतर्गत विद्यार्थिनी द्वारे महाविद्यालयातील आजूबाजूचा परिसर, स्नेहनगर परिसर, तेथिल विठ्ठल मंदिर परिसर स्वच्छ करण्यात आले.**स्वच्छता अभियान :** रोजी महाविद्यालयात स्वच्छता अभियान कार्यक्रम राबवण्यात आले. या अंतर्गत विद्यार्थिनी द्वारे महाविद्यालयातील परिसर, आजूबाजूचा परिसर स्वच्छ करण्यात आले. |

<table>
<tr>
<td>11</td>
<td>

**Date: Thursday, 24/09/2024 to Saturday 26/10/2024**

**मतदान जनजागृती**







</td>
<td>

**मतदान जनजागृती -**मतदारांमध्ये जनजागृती होण्याच्या दृष्टीने महाविद्यालयामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. -प्राचार्य डॉ. शरद सांबारे सर यांनी विद्यार्थीनीना मतदानाचे महत्व, मतदानाचा अधिकार याविषयी माहिती दिली. मतदानाचा अधिकार हा नागरिकाचा घटनादत्त अधिकार आहे व प्रत्येक युवक-युवतींनी तो अधिकार वापरून लोकशाही बळकट केली पाहिजे. असे मत त्यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाला विध्यार्थिनीचा उस्फुर्त प्रतिसाद होता.**मतदान जनजागृती प्रतिज्ञा -** गुरुवावर दिनांक २४/०/१०/२०२४ -मी मतदानाचा अधिकार लक्षात ठेवून मतदान करील तसेच इतर नातेवाईक, मित्र मैत्रिणीना मतदान करण्यास प्रेरित करील. अशी सामूहिकरीत्या प्रतिज्ञा घेण्यात आली.**मतदान जनजागृती रॅली व घोषवाक्य -** शुक्रवार दिनांक २५/१०/२०२४ - विद्यार्थिनीद्वारे स्नेह नगर परिसरात रॅली काढण्यात आलीरॅलीत मतदान जनजागृतीवरआधारित घोषवाक्य म्हणन्यात आले. **मतदान जनजागृती रांगोळी स्पर्धा -** शुक्रवार दिनांक २५/१०/२०२४ महाविद्यालयातविद्यार्थिनीद्वारे मतदान जनजागृतीया विषयावरवर आधारित रांगोळी स्पर्धा घेण्यात आली **मतदान जनजागृती पोस्टर प्रदर्शनी -** महाविद्यालयातविद्यार्थिनीद्वारे मतदान जनजागृती या विषयावरवरआधारित पोस्टर तयार करून ते प्रदर्शित केले.
</td>
</tr>
<tr>
<td>12</td>
<td>

**Date: Monday, 28/10/2024**

**दिवाली विथ माय भारत पोर्टल**



</td>
<td>

**दिवाली विथ माय भारत पोर्टल -या अंतर्गत** महाविद्यालयातर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यात विद्यार्थी द्वारे स्नेह नगर परिसर स्वच्छता अभियान, छत्रपती चौक येथे रस्ता सुरक्षा अभियान, रस्ता सुरक्षा नियम प्रात्याक्षीक तसेच खामला येथील हॉस्पिटलमध्ये भेट देण्यात आले.
</td>
</tr>
<tr>
<td>13</td>
<td>

**Date: Tuesday, 26/11/2024**

**संविधान दिन**



</td>
<td>

**संविधान दिन** -महविद्यालयात मंगळवार दिनांक संविधान दिनानिमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद सांबारे सर तर प्रमुख वक्ते हविद्यालयातील कनिष्ठ महविद्यालयातील राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. राजेश घोगरे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्यांनी भारतीय संविधान अंगीकृत करून त्याचे पालन करायला पाहिजे असे आव्हान प्राचार्य डॉ. शरद सांबारे सरांनी केले. तर संविधानाचा अभ्यास केल्याशिवाय आपला सर्वांगीण विकास होणार नाही असे उद्गार प्रा. राजेश घोगरे यांनी व्यक्त केले.या प्रसंगी भारतीय संविधान प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन केले.
</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| 14 | **Date: Thursday, 05/12/2024**<br>**एचआयव्ही एड्स दिन**<br> | **एचआयव्ही एड्स दिन -** महविद्यालयात **गुरुवार दिनांक** ०५/१२/२०२४ रोजी **एचआयव्ही एड्स**दिनानिमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. डॉ. ललिता पुंण्या यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. HIV- Aids म्हणजे काय? त्याचे लक्षण कोणते याची महिती दिली. Aids बद्दलचे गैरसमज याविषयी सांगितले. HIV कसा पसरतो त्याचे कारणे कोणती Aids या आजाराला आळा घालण्यासाठी उपोंय योजना कोणत्या तसेच सरकारची योजना या सर्व विषयी माहिती दिली.Aids बाधित व्यक्ती कडे बघण्याचा दृष्टीकोन बदला. असे मत त्यांनी यक्त केले. |
| 15 | **Date: Thursday, 05/12/2024**<br>**जंतनाशक दिन**<br> | **जंतनाशक दिन- जंतनाशक** दिनानिमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. वैद्यकीय आरोग्य अधिकारी महानगर पालिका यांच्या वतीने श्रीमती प्रियांका रंगारी आशा वर्कर यांनी जंतनाशक औषध का घ्यावे त्याचा लाभ काय यैषयी माहिती दिली. सर्वानी वर्षातून एकदा या औषधादाचे सेवन करणे गरजेचे आहे असे सांगितले. ही जनजागृती लोकांमध्ये करावे असे मत त्यांनी व्यक्त केले. विद्यार्थीनीना जंतनाशकऔषध वाटप करण्यात आले. या प्रसंगी सर्व प्राध्यापक व् विद्यार्थिनी उपस्थित होते. |
| 16 | **Date: Wednesdaqy , 15/01/2025**<br>**आरोग्य तपासणी शिबी**<br><br> | **आरोग्य तपासणी शिबीर-** महाविद्यालयात स्वंतत्र सेनानी स्व. यशोदाबाई खापर्डे यांच्या स्मृती दीनाप्रीत्यर्थ आरोग्य निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात प्रांरभिक स्व. यशोदाबाई खापर्डे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. पुरुषोत्तम हेल्थ अँड एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष श्रीमती रत्नमालाताई खापर्डे, सहसचिव श्री गिरीष खापर्डे, महाविद्यालाय विकाश समितीचे सदस्य प्रा.श्री. श्रीकांतजी घोगरे व प्राचार्य डॉ. शरद सांबारे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.त्यानंतर आरोग्य निदान शिबिरात रक्तगट, मधुमेह, रक्तदाब, नेत्र आणि सामान्य आरोग्य तपासणी कण्यात आली. या आरोग्य निन्दन शिबिरात लायन्स क्लबतर्फे रीली पँथोलोजी नागपूर चे टेक्निसीयन निलेश कोमेलवार, नागार्जुन ट्रस्ट नागपूर येथील डॉ. माया ब्रम्हे, डॉ. प्रीती मेश्राम, स्नेह बांगरे आणि स्वामी विवेकानंद मिशन हॉस्पिटल खापरी येथील डॉ. सुनील साठवणे जनरल फिजिशन, डॉ. प्रशांत चौबे फर्मासिस्ट, यांनी सक्रीय सहभाग घेतला.महाविद्यलायातील विद्यार्थीचे पालक तसेच स्थानिक परिसरातील नागरिकांनी या आरोग्य शिबिराला मोठ्या संख्येने उस्फुर्तपणे सहभागी झालेत. |

17


**Date: Sunday, 19/01/20225 to Saturday २५/०१/२०२५**

**राष्ट्रीय सेवा योजना शिबीर**

**शिबिराचे उदघाटन**




व्यायाम




ग्रामसफाई







**राष्ट्रीय सेवा योजना शिबीर**

**शिबिराचे उदघाटन**: महाविद्यालयातर्फे राष्ट्रीयसेवायोजना विशेष शिबीराचे आयोजन समाज भवन पुनर्वसन खापरी येथे आयोजित करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन सोमवार दिनांक २० जानेवारी २०२५ रोजी श्रीमती श्रुती चतुर्वेदी योग आणि मेडीटेशन प्रशिक्षक नागपूर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शरद सांबारे, प्रा. श्रीकांत घोगरे महाविद्यालय विकास समिती सदस्य, प्रतिभा रोकडे ग्रामपंचायत सदस्य तसेच सर्व प्राध्यापक उपस्थित होत.

**शिबिराचा समारोप :** शनिवार दिनांक २५जानेवारी २०२५ रोजी करण्यात आला. **शिबिरात** रोज सकाळी शिबिरार्थींना व्यायाम, सूर्यनमस्कार, व आसनाचे प्रशिक्षण देण्यात आले. श्रमदान अंतर्गत शिबीर परिसर, बौद्ध विहार, मंदिर, व ग्रामसफाई करण्यात आले. लोकांना श्रमदानाचे, स्वच्छतेचे व आरोग्यविषयी माहिती सांगण्यात आले. रोज शिबिरार्थी व गावातील लोकांना वेगवेगळ्या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

**सायबर क्राईम :** या करिता दिपाली मडावी प्रोजेक्ट कोआरडीनेटर, प्रकृती असोसियेशन (NGO), नागपूर,यांना मार्गदर्शना करिता आमंत्रित करण्यात आले.दिपाली मडावी यांनी महिलांवर तसेचअल्पवयीन मुलीवर होणारे अत्याचार,प्रेमप्रकरण, सायबर क्राइम, (सोशल मिडिया द्वारा जे गुन्हे होतात)त्यातून महिलांनी आपली सुरक्षा कशी करावी याविषयी साध्या व सोप्या भाषेत मार्गदर्शन केले.सोशल मिडियाची वास्तविकता समोर मांडली. मोबाईलचा उपयोग शिक्षणाकरिताच करावा. असे मत त्यांनी व्यक्त केले.शलाका बिनीवाले मँडम यांनी सोसल मिडिया, आर्थिक गुन्हे, ओंनलाईन गेम्स द्वारे गुन्हे या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी सोशल मिडिया चा वापर करतांना सेक्कुरिटी असावी. ती कशी करावीज्यात टू स्टेप वेरीफिकेशन, स्टाँग पासवर्ड, हे प्रात्यक्षिक द्वारे संगितले. स्वताची सुरक्षा स्वताच्या हातात आहे.जर काही वाईट घडले तर तक्रार कशी नोंदवावी याची माहिती दिली.

**रस्ता सुरक्षा अभियान : "सडक सुरक्षा जागरुकता आणि अपघात मुक्त परिसर अभियान"** करिता जन आक्रोश संस्था, नागपूर चे पदाधिकारी श्री संजय मारवाह व श्री कुलकर्णी यांना आमंत्रित करण्यात आले. त्यांनी सडक सुरक्षा व अपघात कसे टाळता येईल याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी वाहतूक नियंत्रणाचे नियम सांगितले. छोटे छोटे नियम कसे पाळायला पाहिजे सांगितले.

**ग्रामगीता भजन**



**नि:शुल्क रोगनिदान शिबीर**



**LPG गँस बचत वगँस सुरक्षा**



**कौशल्य विकास मार्गदर्शन**



**योगा मेडीटेशन**



**ग्रामगीता भजन :** श्री भाऊराव थोटे गुरुजीव त्यांच्या सहकारी द्वारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी लिहिलेल्या ग्रामगीतावर आधारित भजन गाऊन लोकामध्ये अंधश्रध्दा, बंधुभाव, राष्ट्रप्रेम, देशप्रेम, स्वच्छतेचे महत्व याविषयी जनजागृती केले.

**नि:शुल्क रोगनिदान शिबीर :** स्वामी विवेकानंद मिशन हॉस्पिटल खापरी येथील डॉ. साठवणे जनरल फिजिशन, डॉ. चौबे फर्मासिस्ट, डॉ. रंजना नेत्र तज्ञ व त्यांची चमू यांनी गावातील लोकांची आरोग्य तपासणी केली व त्यांना औषधे दिली. या प्रसंगी विद्यार्थीनिनी सेवा दिली

**LPG गँस बचत वगँस सुरक्षा :** बालाजी गँस एजन्सी कडून भारत गँस कंपनीच्या सौजन्याने श्री. मनीष खापर्डे व श्री. अश्विन यांनी गँस बचत कशा पद्धतीने करावी तसेच गँस सुरक्षा (सिलेंडर ) लिक,त्याचे वजन कसे चेक करावे? होणारे धोके टाळण्यासाठी उपाय याची माहिती दिली.

**उद्योगजगता विकास मार्गदर्शन :** श्री संतोष रामगिरीवार वरिष्ठ मँनेजर सूक्ष्म वित्त सहायता बँक ऑफ महाराष्ट्र, नागपूर यांनी उद्योगजगता विकास या विषयावर मार्गदर्शन केले. स्वयं रोजगार कसे करू शकता त्यासाठी काय करावे याची संपूर्ण माहिती दिली. त्यांच्या इथे स्वयं रोजगार प्रशिक्षण अंतर्गत कोणकोणते प्रशिक्षण दिले जाते व उद्योग सुरु करण्यासाठी लोन कशा पद्धतीने उपलब्ध होऊ शकते हि सर्व माहिती दिली.

**कौशल्य विकास मार्गदर्शन:** श्री. सारंग बोकडे प्रशिक्षक अंबुजा फौंडेशन, यांनी इंफोसेप्स फौंडेशन मध्ये रोजगार मार्गदर्शित प्रशिक्षण अंतर्गत कोणकोणते प्रशिक्षण दिले जाते, योग्यता, प्रशिक्षण सुविधा, रोजगार प्राप्ती, नोकरीत सहायता या विषयी माहिती दिली. तसेच शिक्षण घेत असतांना आपले ध्येय निश्चित करून योग्य करिअर कसे निवडावे. ते पूर्ण करण्यासाठी जिद्द, चिकाटी व निरंतर प्रयास (परिश्रम) आवश्यक आहे. संकल्प करा.छोट्या छोट्या परीक्षा द्या व आपले स्वप्न पूर्ण करा अशी माहिती त्यांनी दिली.

**योगा मेडीटेशन:** श्रीमती श्रुती चतुरवेदी आर्ट ऑफ लिविंग सदस्य, योगा मेडीटेशन/सुदर्शन क्रिया प्रशिक्षक बंगलोर यांनी योगासन हे योग नसून“ समग्र योगक्षेत्र विशाल आहे”. असे सांगितले. सुंदर स्वस्थ व तणाव रहित जीवन जगण्याची कला, सकारात्मकता, एकाग्रता, मेमरी पावर वाढवणे, निर्णय क्षमता, मनशांती ,स्वताच्या व दुसऱ्याच्या आनंदासाठी योग व ध्यान (मेडीटेशन) चा कसा प्रयोग करावा तसेच हि क्रिया कोणी व केंव्हा करू नये हे देखील सांगितले, प्रार्थना सांगून ध्यान क्रिया चे प्रात्यक्षिक करून दाखविले. प्रत्येकाला करावयास सांगून, स्वतः शांतीचा अनुभव करण्यास सांगितले.

| | | |
|---|---|---|
| | **राष्ट्रीय मतदार दिन**<br><br>**श्रमदान**<br><br>**सांस्कुतिक कार्यक्रम**<br> | **राष्ट्रीय मतदार दिन :** शनिवार दिनांक २५/०१/२०२५ रोजी **"राष्ट्रीय मतदार दिन"** निमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविध्यालायाचे प्राचार्य डॉ. शरद सांबारे, उपसरपंच व सर्व प्राध्यापक उपस्थित होते.प्राचार्य डॉ. शरद सांबारे यांनी मतदार दिवसाचे महत्व, २५ जानेवारीच का?, राष्ट्र निर्माणात मतदाराची महत्वाची भूमिका, मतदार कार्डाचे महत्व या सर्व विषयावर प्रकाश टाकला. मतदाराची उदासीनता दूर करून त्यांच्यात जागरुकता निर्माण केली पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले राष्ट्रीय विकासाकरिता प्रत्येक व्यक्तीने मतदान करणे आवश्यक आहे, असा मौलिक संदेश त्यांनी दिला. लोकशाहीवर निष्ठा ठेवण्यासाठी मार्गदर्शना नंतर लगेच प्राचार्यडॉ. शरद सांबारे यांच्या मार्गदर्शनात शपथ घेण्याचा कार्यक्रम घेण्यात आला.<br>**श्रमदान :** अंतर्गत शिबीर परिसर, बौद्ध विहार, हनुमान मंदिर, जगनाथ मंदिर, जिल्हापरिषद शाळा व ग्रामसफाई करताना प्लास्टिक संकलन करण्यात आले. लोकांना श्रमदानाचे, स्वच्छतेचे महात्व व आरोग्यविषयी माहिती सांगण्यात आले.<br>**सांस्कुतिक कार्यक्रम**: शिबिरार्थि द्वारे नुत्य, नाटिका सादर करण्यात आले. या शिबिरात शिबिरार्थिनी व गावकऱ्यानि उस्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिराच्या आयोजनाकरिता प्राचार्य डॉ. शरद सांबारे, डॉ. ललिता पुन्नय्या, डॉ. महेंद्र कटरे, डॉ. अमोल राऊत प्रा. राजेश घोगरे, डॉ. के.जी. मेश्राम, डॉ. गोविंद रावळेकर, डॉ. सुर्यकांत कापशीकर, प्रा. जरिना सलीम, डॉ. रश्मी नारनवरे तसेच शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी सहकार्य केले. |
| 18 | **Date: Friday, 21/02/2025**<br>**पंचवटी वृद्धाश्रमला भेट**<br><br> | **पंचवटी वृद्धाश्रमला भेट-** महाविध्यालायातील राष्ट्रीय सेवा योजना व समाजशास्त्र विभागातर्फे पंचवटी वृद्धाश्रम उमरेड रोड नागपूर येथे भेट कार्यक्रम राबवण्यात आले. विद्यार्थीनिनी वृद्धाश्रमाला भेट दिली. तेथील समाजसेविका श्रीमती प्रियंका गायधने यांनी संस्थेची माहिती देतांना तिथले नामांकन ,उपक्रम, संस्थेची कार्यप्रणाली, नियम तसेच देण्यात येणाऱ्या सुविधा,याची संपूर्ण माहिती विद्यार्थीनिनि वृद्धाश्रमातील प्रत्येक व्यक्तींसोबत हितगुज केले. त्यांना भेटवस्तू दिल्या. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. शरद सांबारे सरांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| 19 | **Date: Tuesday, 25/02/2025**<br>**नेत्र दान  मार्गदर्शन**<br><br> | **नेत्र दान  मार्गदर्शन-**महाविद्यालयात मंगळवार दिनांक २५/०२/२०२५ रोजीराष्ट्रीय सेवा  योजना विभागातर्फे **नेत्र दान** जनजागृतीच्या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.या कार्यशाळेत  मार्गदर्शन करिताडॉ. नामदेव दोरखंडे, आयुर्वेदाचार्य, नागपूरयांना आमंत्रित करण्यात आले. डॉ. गौतम गुप्ता डॉ. के.जी.मेश्राम, डॉ. सुनील शाहू, श्रीमती रंजना शाहू  प्रामुख्याने उपस्थित होते. डॉ. नामदेव दोरखंडे, त्यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. अन्नदान, वस्त्रदान, पैसे दान या सर्वपिक्षा अवयव दान हे श्रेष्ठ दान आहे असे सांगून अवयव दान म्हणजे काय? त्याची संकल्पना, अवयव दान विषयी समाज-गैरसमज, कायदा, अवयव दानाचे महत्व, कोण-कोणते अवयव दान करता येते. कोण केंव्हा **अवयव दान** व् **नेत्र दान** करू शकतो, **अवयव दान व् नेत्र दान** करिता नाव नोंदणी,  याची संपूर्ण प्रक्रिया सांगितली.**नेत्र दान**हे श्रेष्ठ दान आहे. नेत्र हे मेंदूशी जोडलेले असते. म्हणून पूर्ण डोळा दान केल्या जाऊ  शकत नाही.डोळयाचा फक्तकोर्निया हा  भाग घेतला जातो.नेत्र दाना  सारख्या अमूल्य दानाकरिता लोकांनी स्व इच्छेने समोर यायला पाहीजे जेणे करून त्यांच्या डोळयांनी दुसरी व्यक्ती जग बघू शकेल. प्रत्येक व्यक्तींनी **अवयव दान** तसेच**नेत्र दान** करण्याकरिता फॉर्म भरायला पाहिजे. हि जागरुकता प्रत्येक व्यक्तीत रुजवीण्याचे काम विद्यार्थी करू शकतो असे मत त्यांनी व्यक्त केले.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद सांबारे  यांनी अवयवदानामुळे मिळणारे जीवनदान व त्यापासून मिळणारा सेवाभावाचा आनंद याची इतर बाबीसोबत तुलनाच करता येत नाही असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे आयोजन  डॉ. ललिता पुन्नय्या व आभार डॉ. महेंद्र कटरे यांनी केले.या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. विद्यार्थीनिनी उस्फुर्त सहभाग घेतला. |